जनसंपर्क कक्ष

0 6 MAR 2021 **लोकमत** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहा एप्रिलला ऑनलाईन दीक्षांत समारंभ

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, अनिल सहस्त्रबुध्दे यांची प्रमुख उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ दि. ६ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता ऑनलाईन स्वरूपात होणार आहे. त्याच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे प्रमुख उपस्थित असणार आहेत. यावर्षी पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ७७ हजार ३०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाने ५७ वा दीक्षांत समारंभ आयोजित केला आहे. कोरोनाचा





भगतसिंह कोश्यारी अनिल सहस्त्रबुध्दे

प्रादुर्भाव वाढत असल्याने हा समारंभ ऑनलाईन स्वरूपात होईल. त्यासाठी ऑनलाईन उपस्थित राहण्याबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे यांनी विद्यापीठाला कळविले आहे. त्यानुसार विद्यापीठाने शुक्रवारी या समारंभाची तारीख जाहीर केली. यावर्षी पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ७७ हजार ३००

### विद्यार्थ्यांसाठी हे महत्त्वाचे

पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी दीक्षांत विभागात जमा करण्याची अंतिम मुदत बुधवार (दि. १०) पर्यंत आहे. या मुदतीपूर्वी विद्यार्थ्यांनी पोस्टव्दारे अथवा प्रत्यक्षात येऊन हार्ड कॉपी जमा करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदणी केली असून, त्यापैकी ६० हजार जणांनी अर्जाची हार्ड कॉपी दीक्षांत विभागामध्ये जमा केली आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक आणि कुलपती मेडल विजेत्या विद्यार्थ्यांची घोषणा या समारंभाच्या दोन दिवस आधी जाहीर केली जाणार आहेत. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यादांच अशा पध्दतीने ऑनलाईन दीक्षांत समारंभ होणार आहे.

पुढारी

# दीक्षान्त समारंभाची विद्यापीठाकडून तयारी सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षान्त समारंभ ६ एप्रिल रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ परीक्षा विभागाकडून तयारी सुरू आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दीक्षान्त समारंभ आयोजनाबाबत नियोजन सुरू झाले आहे. परीक्षा विभागाकडून ७७ हजार ३०० पदवी, पदव्युत्तर प्रमाणपत्रांसाठी केलेल्या अर्जांची तपासणी अंतिम टप्प्यात आहे. पारितोषिकांच्या याद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. पीएच.डी. पदव्यांचे वाटप यासह इतर कामकाजाची माहिती लवकरच अधिकार मंडळासमोर ठेवली जाणार आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयानंतर दीक्षान्त समारंभ कशा प्रकारे घ्यायचा याचा निर्णय होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

तरूण भारत

# ६ एप्रिल रोजी ऑनलाईन दीक्षांत समारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार ६ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे उपस्थित राहणार आहेत.



तर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. या दीक्षांत समारंभात ७७ हजार ३०० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वाटप होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. यंदा पहिल्यांदाच विद्यार्थी संख्या जास्त आहे. दीक्षांत समारंभाची मिरवणूक, स्टेज ग्रंथदिंडी यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनात चर्चा सुरू असून, हा विषय अधिकार मंडळासमोर ठेवून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. एम. फिल आणि पीएच. डी च्या स्नातकांना पदवी प्रमाणपत्र कशा पद्धतीने द्यायचे या संदर्भात चर्चा सुरू आहे. तसेच दोन गोल्ड मेडल, इतर महत्त्वाची पदके देण्यासंदर्भात निर्णय अधिकारी मंडळ येणार आहे. विद्यापीठात दीक्षान्त समारंभाची जय्यत तयारी सुरु झाली आहे.

पुढारी

# डॉ. जयसिंगराव पवार संपादित ग्रंथांचे आज विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक' व 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूरची चळवळ' या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ शनिवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृह येथे होणार आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथ प्रकाशन समारंभ होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC 'A' Grade

## ५७ वा दीक्षांत समारंभ अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार दि. ६ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन पद्धतीने संपन्न होत आहे. सदरच्या समारंभासाठी माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, अध्यक्ष अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, हे उपस्थित राहणार आहेत.

दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती सर्व संबंधितांकरिता नजिकच्या कालावधीमध्ये विद्यापीठाचे संकेतस्थळ व दैनिकांमधून प्रसिध्द करणेत येईल.

दीक्षांत विभाग
दि. ६/०३/२०२१

गजानन पळसे
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

0 6 MAR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# थीन फिल्म संशोधनात विद्यापीठाचे योगदान

## भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजपुरे यांचा जागतिक टॉप टेन संशोधकात समावेश

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाची ओळख आहे. याच विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. केशव राजापुरे यांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठातील संशोधकांनी प्रकाशित केलेल्या जागतिक २ टक्के वैज्ञानिकांच्या यादीत यांनी आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. थीन फिल्म संशोधन क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यांच्या या यशाने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजपुरे शिवाजी विद्यापीठातून १९९९ साली पीएच. डी. पदवी घेतली. त्यांनी ऐरोजेल प्रयोगशाळेत जेआरएफ आणि पुढे एसआरएफ संशोधक म्हणून काम पाहिले. प्रा. सी. एच. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना थीन फिल्म सेप्टम स्टोरेज सेल या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी विशेषत: सोलर सेल, गॅस सेन्सर, यूव्ही डिटेक्टर, फोटोकॅटालिसिस आणि मेमरिस्टर या संशोधन क्षेत्रात भरीव काम केले आहे. त्यांच्या या संशोधनाचा इंडस्ट्रींना चांगला उपयोग होत आहे.

### २०० संशोधन लेख

राजपुरे यांनी सोप्या व कमी खर्चात तयार केलेले पदार्थ अत्याधुनिक आणि महागड्या पद्धतीने तयार केलेल्या पदार्थांशी समकक्ष आहेत. आतापर्यंत त्यांचे २०० संशोधन लेख विविध आंतरराष्ट्रीय नामांकित नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या संशोधनाचा एच-इंडेक्स ५३ च्या आसपास आहे. हे संशोधन करत असताना ते पीएचडीच्या विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन करतात.



डॉ. केशव राजापुरे

नव्वदच्या दशकातील सौर ऊर्जेचे या विषयावर प्रा. राजपुरे यांनी पीएच. डी. पदवसाठी संशोधन करीत 'अँटिमनी सल्फाईड' हा पदार्थ निवडून त्याच्या सौरऊर्जा रूपांतरणाच्या गुणधर्माचा अभ्यास केला. सौरघटातील उपयोगासोबतच त्या पदार्थाचा वापर सेप्टम विद्युत घटकातही होऊ शकतो, हे त्यांनी प्रयोगाअंती सिद्ध करून दाखवले. स्प्रे पायरोलायसिस तंत्राचा उपयोग करून अनेक पारदर्शक विद्युतसुवाहक मेटल ऑक्साइडच्या थिन फिल्म तयार केल्या आहेत. ज्वलनशील, धोकादायक विषारी वायू तपासण्यासाठी गॅस सेन्सर केला आहे. आता त्यांनी फोटोडिटेक्टर व गॅस सेन्सर असे दुहेरी कार्य करणारे (बहुआयामी) उपकरण तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले. प्रा. राजपुरे यांनी विद्युतचुंबकीय सेन्सर्स तयार करण्यासाठी विविध फेराईट, ऑक्साइड व त्यांच्या मिश्रणाचा अभ्यास केला आहे. त्यांनी सौरऊर्जा वापरुन पाण्यातील प्रदूषकांच्या निर्मूलनावर (फोटोकॅटालायसिस) संशोधन केले आहे.

औद्योगीकरणामुळे तयार झालेली जलप्रदूषणाची समस्या दूर करण्यासाठी त्यांनी सूर्यकिरणे वापरुन टिटॅनियम ऑक्साइड या पदार्थाच्या सानिध्यात विविध सेंद्रिय रसायने, जैविक पेशी तसेच समुद्राच्या पाण्यातील सेंद्रिय प्रदूषकांचे निर्मूलन करण्याचे तंत्र विकसित केले आहे. त्यानंतर त्यांनी सॅलिसिलिक ॲसिड आणि ४-क्लोरोफेनॉल यासारख्या जवळजवळ पंधरा प्रदूषकांचेदेखील विविध ऑक्साइड उत्प्रेरके वापरुन निर्मूलन करून दाखवले आहे. फोटोकॅटालायसिस या क्षेत्रातील ते एक नामांकित संशोधक आहेत.